सोलापूर
तरुण भारत
# सदाफुली
https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com
बुधवार, २९ एप्रिल २०२६

आतील पानावर
पान २– ‘धुरंधर’ अजून संपला नाही!
पान ३– ‘या’ व्यक्तीवर अमिर बनवतोय बायोपिक
पान ४– ‘या’ व्यक्तीवर अमिर बनवतोय बायोपिक
पान ५– डेटिंगसाठी मला वेळच नाहीये
पान ७–‘घबाडकुंड’ मध्ये संदीप पाठकचा...




# ‘राजा शिवाजी’च्या ट्रेलरचे अनावरण



गेली दहा वर्ष छत्रपती शिवाजी महाराजांच्या आयुष्यावर आधारित भव्यदिव्य ऐतिहासिकपट बनवण्याचे स्वप्न उराशी बाळगून असलेल्या निर्माता, दिग्दर्शक आणि अभिनेता रितेश विलासराव देशमुख यांनी नुकताच ‘राजा शिवाजी’ या चित्रपटाची पहिली झलक प्रेक्षकांसमोर आणली. पहिल्यांदाच मराठी आणि हिंदीत तयार करण्यात आलेल्या या चित्रपटाचा भाग असलेले अभिनेता संजय दत्त, अभिषेक बच्चन, बोमन इराणी, दिग्दर्शक- अभिनेते महेश मांजरेकर, जितेंद्र जोशी, अभिनेत्री विद्या बालन, भाग्यश्री पटवर्धन अशी तारेतारकांची मांदियाळी ‘राजा शिवाजी’च्या ट्रेलर अनावरण सोहळ्याला उपस्थित होती.


‘गेले दशकभर छत्रपती शिवाजी महाराजांवर चित्रपट बनवण्यासाठी मी प्रयत्न करत होतो. २०१६ मध्ये हा प्रयत्न सफल झाला नाही, २०१९ मध्ये पुन्हा एकदा चित्रपट निर्मितीचा प्रस्ताव पुढे केला आणि कोविडचे महासंकट समोर आले. अखेर, २०२३ मध्ये निर्धाराने या चित्रपटाच्या तयारीला लागलो आणि आज महाराजांचा एक मावळा या भावनेनेच ‘राजा शिवाजी’ ही कलाकृती प्रेक्षकांसमोर ठेवतो आहे’ हे सांगताना दिग्दर्शक आणि शिवाजी महाराजांची भूमिका अशा दुहेरी जबाबदारीचे शिवधनुष्य पेलणाऱ्या रितेश देशमुख यांचा कंठ दाटून आला होता. ‘राजा शिवाजी’च्या ट्रेलर अनावरण सोहळ्यात जिओ स्टुडिओजच्या ज्योती देशपांडे यांच्यासह निर्माती, अभिनेत्री जिनिलिया देशमुख आणि चित्रपटाचे संगीतकार अजय-अतुल, अभिनेता-दिग्दर्शक अमोल गुप्ते हेही उपस्थित होते. १ मे २०२६ रोजी महाराष्ट्र दिनाच्या मुहूर्तावर हा चित्रपट मराठी आणि हिंदी भाषेत प्रदर्शित होणार आहे. ‘राजा शिवाजी’ चित्रपटात अभिनेत्री विद्या बालन हिने बडी बेगमची भूमिका केली आहे. ‘या चित्रपटाच्या निर्मितीची माहिती मिळाली तेव्हा रितेशने अजून मला कुठल्याच भूमिकेसाठी का विचारले नाही, असा प्रश्न मला सतावत होता. एक दिवस त्याने खरोखरच या चित्रपटात बडी बेगमची भूमिका करणार का? अशी विचारणा केली. तेव्हा माझ्या चेहऱ्यावरची उत्सूकता लपवत मी होकाराकरता एक दिवस त्याच्याकडून मागून घेतला, पण खरेतर मी मनापासून या संधीची वाट पाहात होते’, अशी आठवण सांगितली.

# डेविड अन् शाहरुखने म्हणून केलं नाही एकत्र काम



बॉलिवूड फिल्ममेकर डेविड धवन सध्या त्यांच्या अपकमिंग 'हैं जवानी तो इश्क होना है' या सिनेमामुळे चर्चेत येत आहेत. हा सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्यामुळे त्याचं जोरदार प्रमोशन सुरु आहे. डेविड यांनी त्यांच्या कारकिर्दीमध्ये सलमान खान, गोविंदा, अक्षय कुमार, अमिताभ बच्चन, संजय दत्त अशा अनेक दिग्गजांसोबत काम केलं. मात्र, आजतागायत त्यांनी बॉलिवूडचा किंग खान अर्थात शाहरुख खानसोबत काम केलेलं नाही. डेविड आणि शाहरुख खान या दोघांनाही इंडस्ट्रीमध्ये काम करुन बरीच वर्ष झाली आहेत. परंतु, आजपर्यंत या दोघांनी कधीच एकत्र काम केलं नाही.अलिकडेच डेविड यांनी मुलाखत दिली. या मुलाखतीमध्ये त्यांनी शाहरुखसोबत काम न करण्यामागचं कारण सांगितलं. 'तुम्ही शाहरुखसोबत सिनेमा का केला नाही?' असा प्रश्न डेविड यांना विचारण्यात आला. त्यावर, असं काही नाही. पण, एक काळ होता जेव्हा आम्ही दोघेही एकत्र काही तरी करायचा प्लॅन करत होतो. पण, मी तेव्हा कायमच बिझी असायचो. माझ्याकडे एकाच वेळी दोन-दोन सिनेमा असायचे. त्यामुळे आमचं एकत्र काम करणं राहून गेलं. पण, एक वेळ नक्कीच अशी येईल ज्यात आम्ही एकत्र काम करु', असं डेविड म्हणाले. पुढे ते म्हणतात, एका ठराविक कलाकारासोबतच मी काम करेन असं मी कधीच केलं नाही.

मी गोविंदा, सलमान, संजय दत्त यांसारख्या अनेक कलाकारांसोबत काम केलं. पण, असं काही झालं की मला शाहरुख सोबत काम करायची संधीच मिळाली नाही. दरम्यान, डेविड धवन यांनी त्यांच्या ३७ वर्षाच्या कारकिर्दीमध्ये अनेक सुपरहिट सिनेमा बॉलिवूडला दिले. यात बड़े मियां छोटे मियां, पार्टनर, राजा बाबू, कुली नंबर १, जुड़वा, हीरो नंबर १ आणि मुझसे शादी करोगी यांसारख्या सिनेमांचा समावेश आहे. लवकरच त्यांचा है जवानी तो इश्क होना है हा सिनेमा रिलीज होणार आहे. हा सिनेमा प्रथम ४ जून रोजी रिलीज होणार होता. मात्र, आता तो २२ मे रोजी रिलीज होणार आहे.



# 'धुरंधर' अजून संपला नाही!

बॉलिवूडमध्ये आदित्य धर दिग्दर्शित 'धुरंधर' आणि 'धुरंधर: द रिव्हेंज' या दोन्ही चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर बक्कळ कमाई केली. जगभरात आपला ठसा उमटवल्यानंतर आदित्य धर या चित्रपटाबद्दल एक खास गोष्ट प्रेक्षकांसमोर आणणार आहे. रणवीर सिंग स्टारर 'धुरंधर'चा 'मेकिंग व्हिडिओ' आता सिनेमागृहात प्रदर्शित करण्याची तयारी सुरू आहे. त्यामुळे आदित्य धरच्या 'धुरंधर'ची पडद्यामागची गोष्ट प्रेक्षकांना मोठ्या पडद्यावर बघायला मिळेल. 'धुरंधर' आणि 'धुरंधर २' च्या अभूतपूर्व यशानंतर निर्मात्यांनी या चित्रपटाच्या मेकिंगची प्रक्रिया प्रेक्षकांसमोर आणण्याचा निर्णय घेतला आहे. चित्रपटातील सर्व 'बिहाइंड द सीन्स' फुटेज आणि कलाकारांच्या मुलाखती एकत्रित करून एक वेगळा पूर्ण चित्रपट तयार करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, यापूर्वी २०२४ मध्ये 'झिरो से रीस्टार्ट' हा मेकिंगवर आधारित चित्रपट आला होता, मात्र त्याला इतका प्रतिसाद मिळाला नव्हता. मात्र 'धुरंधर'बद्दलची क्रेझ पाहता निर्माते हा धाडसी प्रयोग करत आहेत. माहितीनुसार, 'धुरंधर'चा हा इढ़ड व्हिडीओ मेंकिगपट २०२६ च्या शेवटी सिनेमागृहात प्रदर्शित केला जाऊ शकतो. त्यानंतर तो ओटीटी प्लॅटफॉर्मवरही पाहण्यास उपलब्ध होईल. दिग्दर्शक आदित्य धर यांनी आतापर्यंत चित्रपटाच्या मेकिंगचे कोणतेही व्हिडिओ सोशल मीडियावर लीक होऊ दिले नाहीत, त्यामुळे पडद्यामागे हे 'धुरंधर' सीन्स कसे शूट झाले, हे सर्व पाहणं प्रेक्षकांसाठी मोठं सरप्राईज असतील. कोणताही बॉलिवूड चित्रपट जेव्हा रिलीज होतो त्याआधी कलाकार मीडियाला मुलाखती देताना दिसतात, पण 'धुरंधर'च्या बाबतीत रणवीर सिंग, अर्जुन रामपाल किंवा सिनेमातील कोणत्याही मुख्य कलाकाराने अद्याप मोठी मुलाखत दिलेली नाही. त्यामुळे प्रमुख कलाकारांच्या पहिल्या अधिकृत मुलाखती थेट या 'मेकिंग' चित्रपटाचा भाग असतील. १९ मार्च रोजी प्रदर्शित झालेल्या 'धुरंधर २' या चित्रपटाने जगभरात तब्बल १,७५८ कोटी रुपयांची कमाई केली आहे. या चित्रपटात रणवीर सिंगसोबत अर्जुन रामपाल, अक्षय खन्ना, सारा अर्जुन, राकेश बेदी, संजय दत्त, आर. माधवन आणि दानिश पंडोर यांसारखे दिग्गज कलाकार आहेत. 'धुरंधर'च्या पडद्यामागच्या या BTS प्रवासाला पाहण्यासाठी चाहते आता प्रचंड उत्सुक आहेत.





# ‘या’ व्यक्तीवर अमिर बनवतोय बायोपिक

बॉलिवूडचा 'मिस्टर परफेक्टनिस्ट' आमिर खान सध्या त्याच्या आगामी प्रोजेक्ट्समुळे चर्चेत आहे. 'सितारे जमीन पर' नंतर आमिरच्या हाती एक मोठा चित्रपट लागला असून, तो'शार्क टँक इंडिया'चा परीक्षक आणि उद्योगपती अशनीर ग्रोव्हर याचा बायोपिक असल्याचे म्हटले जात आहे. विशेष म्हणजे, या चित्रपटात आमिरच्या विरुद्ध बॉलिवूडची 'स्त्री' अर्थात मराठमोळी श्रद्धा कपूर मुख्य भूमिकेत दिसणार असल्याची दाट शक्यता आहे. वृत्तानुसार, ३९ वर्षीय श्रद्धा कपूर या बायोपिकमध्ये महत्त्वाची भूमिका साकारणार आहे. ६१ वर्षीय आमिर खान आणि त्याच्यापेक्षा २२ वर्षांनी लहान असलेली श्रद्धा पहिल्यांदाच स्क्रीन शेअर करणार असल्याने चाहत्यांमध्ये उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. रिपोर्टनुसार, आमिरने या चित्रपटाची स्क्रिप्ट वाचली असून तो कथेने प्रचंड प्रभावित झाला आहे. त्यामुळे त्याने या प्रोजेक्टसाठी हिरवा कंदील दाखवला आहे.

सध्या हा चित्रपट प्री-प्रॉडक्शन स्टेजवर आहे. चर्चा अशीही आहे की, श्रद्धा कपूरचा कथित बॉयफ्रेंड राहुल मोदी या चित्रपटाचे दिग्दर्शन करू शकतो. अद्याप या चित्रपटाबाबत कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही, मात्र पडद्यामागे वेगाने हालचाली सुरू आहेत. आमिर खानचे गेल्या काही वर्षांतील 'ठग्स ऑफ हिंदोस्तान' आणि 'लाल सिंग चड्ढा' हे चित्रपट बॉक्स ऑफिसवर फारशी कमाल दाखवू शकले नाहीत. 'सितारे जमीन पर'ला चांगला प्रतिसाद मिळाला असला, तरी आमिरला एका मोठ्या ब्लॉकबस्टरची प्रतीक्षा आहे.




# ‘पती पत्नी और वो २’ लांबणीवर!

आयुषमान खुराना आणि सारा अली खान यांच्या बहुप्रतीक्षित 'पती पत्नी और वो २' या कॉमेडी चित्रपटाच्या प्रदर्शनाची नवीन तारीख जाहीर करण्यात आली आहे. हा चित्रपट आधी ४ मार्च रोजी प्रदर्शित होणार होता, मात्र काही कारणास्तव निर्मात्यांनी चित्रपटाची रिलीज डेट पुढे ढकलली आहे. आता हा चित्रपट मे महिन्यात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. निर्मात्यांनी सोशल मीडियावर एक मजेशीर पोस्ट शेअर केली आहे, ज्यामध्ये आयुषमान एका बिबट्यासोबत जाळ्यात अडकलेला दिसत आहे. या पोस्टच्या कॅप्शनमध्ये लिहिले आहे, शिकारी स्वतःच शिकार झाला! आता जाळ्यात अडकले आहेत आमचे प्रजापति पांडे. 'पती पत्नी और वो २' साठी तयार राहा, कारण हा चित्रपट आता १५ मे रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होत आहे. या चित्रपटात आयुषमान आणि सारा यांच्यासोबतच रकुल प्रीत सिंह आणि वामिका गब्बी महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. हा चित्रपट २०१९ मध्ये आलेल्या 'पती पत्नी और वो'चा सीक्वल आहे. पहिल्या भागाने बॉक्स ऑफिसवर ८६.८९ कोटींची कमाई करत चांगली कामगिरी केली होती, त्यामुळे या सीक्वलकडून चाहत्यांना खूप अपेक्षा आहेत. चित्रपटाचे प्रदर्शन पुढे ढकलण्याबाबत निर्मात्यांनी सांगितले की, त्यांनी एक दर्जेदार चित्रपट बनवला आहे आणि घाईघाईत चित्रपटाचे काम खराब करण्याची त्यांची इच्छा नाही. तांत्रिक कामे आणि इतर सर्व गोष्टी पूर्ण झाल्यानंतरच चित्रपट प्रदर्शित करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे, जेणेकरून प्रेक्षकांच्या मनोरंजनात कोणतीही कमतरता राहू नये. मुदस्सर अझीझ दिग्दर्शित हा चित्रपट पुन्हा एकदा प्रेक्षकांना 'प्रजापति पांडे'च्या मजेशीर जगात घेऊन जाणार आहे. यात ड्रामा, कॉमेडी आणि रोमान्सचा जबरदस्त तडका पाहायला मिळेल. भूषण कुमार आणि रेणू रवी चोप्रा यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर काय धमाल करतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

# इमरानच्या ‘या’ चित्रपटाचा सिक्वेल येणार



हिंदी चित्रपटसृष्टीतील 'सीरिअल किसर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमरान हाश्मीच्या चाहत्यांसाठी एक मोठी आनंदाची बातमी समोर आली आहे. २००७ मध्ये प्रदर्शित झालेल्या सुपरहिट 'आवारापन' चित्रपटाचा सिक्वेल म्हणजेच 'आवारापन २' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. विशेष भट्ट, इमरान हाश्मी आणि दिशा पटानी यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून या चित्रपटाची पहिली झलक शेअर करत प्रदर्शनाची तारीख जाहीर केली आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने विशेष भट्ट आणि इमरान हाश्मी ही यशस्वी जोडी पुन्हा एकदा एकत्र काम करताना दिसणार असून, नितीन कक्कड यांनी या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळली आहे. तब्बल १९ वर्षांनी इमरान हाश्मीच्या गाजलेल्या चित्रपटाचा सिक्वेल येतोय. अखेर बहुप्रतिक्षित 'आवारापन २' च्या प्रदर्शनाची तारीख जाहीर झाली आहे. हिंदी चित्रपटसृष्टीतील अत्यंत गाजलेल्या चित्रपटाचा हा सिक्वेल आहे. हा चित्रपट १४ ऑगस्ट २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने चित्रपट निर्माते विशेष भट्ट आणि अभिनेता इमरान हाश्मी प्रदीर्घ काळानंतर पुन्हा एकदा एकत्र येणार आहेत. विशेष भट्ट, इमरान हाश्मी आणि दिशा पटानी यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून 'आवारापन २' ची एक छोटीशी झलक चाहत्यांना दाखवली. या पोस्टद्वारे त्यांनी १४ ऑगस्टला हा चित्रपट रिलीज होणार असल्याचं जाहीर केलं.'आवारापन'बद्दल निर्माते विशेष भट्ट म्हणाले, आवारापन हा सिनेमा नाही, तर एक भावना आहे, जी फक्त मोठ्या पडद्यासाठीच बनली आहे. यामध्ये परदेशातील सुंदर लोकेशन्स आणि सुंदर दृश्ये पाहायला मिळतील. या चित्रपटात दमदार पात्रे, दर्जेदार संगीत आणि उत्तम कथानकावर आधारित आहे. इमरानने 'शिवम' या पात्रातील वेदना उत्तम पद्धतीने पडद्यावर जिवंत केल्या आहेत. तो त्या भूमिकेत शिरला होता. आणि आता दिशा पाटनी आमच्याबरोबर या चित्रपटात जोडली गेली आहे, त्यामुळे हा चित्रपट आणखी खास ठरणार आहे. या चित्रपटाच्या निमित्तानं दिशा पाटनी पहिल्यांदाच 'विशेष फिल्म्स'बरोबर काम करतेय. दिशाने यापूर्वी 'मलंग', 'बागी २', 'एम.एस. धोनी: द अनटोल्ड स्टोरी' आणि 'कल्की २८९८-एडी' सारख्या चित्रपटांमध्ये काम केलं आहे. 'आवारापन २' या चित्रपटाचे दिग्दर्शन नितीन कक्कड यांनी केलं आहे. विशेष भट्ट यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. सध्या या चित्रपटाच्या चित्रीकरणाचा शेवटचा टप्पा मुंबईत सुरू आहे.

# सलमान खान अन् नयनतारा एकत्र!

बॉलिवूड अभिनेता सलमान खान आणि साऊथची लेडी सुपरस्टार नयनतारा यांच्या आगामी बिग बजेट चित्रपटाबाबत अपडेट समोर आली आहे. या अनटाइटल्ड चित्रपटाच्या चित्रीकरणाला सुरुवात झाली असून, मुहूर्ताच्या पूजेसाठी सलमान आणि नयनतारा सेटवर पोहोचल्याचा व्हिडिओ समोर आला आहे. साऊथ दिग्दर्शक वामशी पेडिपल्ली या चित्रपटाचे दिग्दर्शन करत असून, निर्माते दिल राजू यांच्या या प्रोजेक्टमध्ये प्रेक्षकांना साऊथचा जबरदस्त तडका पाहायला मिळणार आहे. गेल्या वर्षी प्रदर्शित झालेला सलमानचा 'सिकंदर' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर कमाल दाखवू शकला नव्हता. त्यामुळेच यावेळी सलमानने आपल्या करिअरची सूत्रे पुन्हा एकदा साऊथच्या अनुभवी दिग्दर्शकाच्या हाती दिली आहेत. वामशी पेडिपल्ली यांचा ट्रॅक रेकॉर्ड पाहता या चित्रपटाकडून मोठ्या अपेक्षा आहेत. सध्या या सिनेमाला तात्पुरते 'एसव्हीसी ६३' असे नाव देण्यात आले आहे, कारण दिग्दर्शक म्हणून वामशी यांच्या करिअरमधील हा ६३ वा चित्रपट आहे. चित्रपट समीक्षक तरण आदर्श यांनी या चित्रपटाच्या मुहूर्ताचा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये सलमान आणि नयनतारा शूटिंगच्या सेटवर दिसत आहेत. ही जोडी पहिल्यांदाच एकत्र झळकणार असल्याने चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. लवकरच या चित्रपटाच्या टायटलचा आणि कथेचा उलगडा केला जाण्याची शक्यता आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण आजपासून सुरू झाले असले तरी, हा चित्रपट पूर्ण होण्यासाठी बराच काळ लागणार आहे. चित्रपटसृष्टीतील चर्चांनुसार, सलमान खान आणि नयनतारा यांचा हा हाय- व्होल्टेज क्शन चित्रपट पुढील वर्षी म्हणजेच २०२७ च्या ईदच्या मुहूर्तावर सिनेमागृहात प्रदर्शित होऊ शकतो.

# मला घटस्फोटाचा पश्चाताप नाही!



हिंदी आणि साऊथ चित्रपटसृष्टीत आपली वेगळी ओळख निर्माण करणारी अभिनेत्री हंसिका मोटवानी सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. मार्च २०२६ मध्ये तिच्या घटस्फोटाची बातमी समोर आली होती. डिसेंबर २०२२ मध्ये तिने सोहेल कथुरिया याच्यासोबत लग्न केले होते, मात्र काही वर्षांतच या नात्याचा शेवट झाला. घटस्फोटानंतर अवघ्या महिन्याभरातच हंसिकाने एका मुलाखतीत मन मोकळं केले. ती म्हणाली, मला घटस्फोटाचा अजिबात पश्चाताप नाही. चुकीच्या ट्रेनमध्ये बसलात तर पुढच्या स्टेशनवर उतरणं हेच योग्य ठरतं. तिच्या या वक्तव्यामुळे सोशल मीडियावरही मोठी चर्चा रंगली आहे. या कठीण काळातून सावरण्यासाठी हंसिकाने अध्यात्माचा मार्ग निवडला. याबाबत खुलासा करत ती म्हणाली, गेल्या दोन वर्षांपासून ती ईश्वरभक्तीत रमली असून हनुमान यांच्यावरील तिची श्रद्धा अधिक दृढ झाली आहे. दर मंगळवार आणि शनिवार ती हनुमान चालिसाचे पठण करते. अस्वस्थता आणि तणाव वाढला की हनुमान चालिसा मला मानसिक बळ देते, असे तिने सांगितले. यासोबतच तिने मानसिक आरोग्याबाबतही आपले मत मांडले. सुरुवातीला या समस्यांची जाणीव नव्हती, पण चिंता आणि तणाव वाढल्यानंतर मैत्रिणीच्या सल्ल्याने तिने थेरपीचा आधार घेतला. यामुळे तिच्या विचारांवर नियंत्रण मिळवणे आणि स्वतःला सावरणे सोप झाले. प्रेमाबाबत विचारले असता हंसिका म्हणाली, प्रेमावर माझा अजूनही विश्वास आहे. योग्य वेळ आल्यावर योग्य व्यक्ती आयुष्यात येईल. सध्या मी स्वतःच्या आनंदावर आणि करिअरवर लक्ष केंद्रित करत आहे. दरम्यान, लहान वयातच करिअरची सुरुवात केलेल्या हंसिकाला शाका लाका बूम बूम आणि क्योंकि सास भी कभी बहू थी या मालिकांमुळे लोकप्रियता मिळाली. मात्र, तिच्या लग्नानंतर वैयक्तिक आयुष्यामुळे ती ट्रोलिंगचाही सामना करत होती.



# ॲटलीच्या 'राका'मध्ये दीपिकाची सीन्स कट?

अभिनेत्री दीपिका पादुकोणने काही दिवसांपूर्वी दुसऱ्या प्रेग्नंसीची घोषणा केली. लेक दुआच्या जन्मानंतर दीड वर्षांनी ती पुन्हा आई होणार आहे. ही गुडन्यूज समजताच चाहत्यांनी तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला. एकीकडे प्रेग्नंसीची घोषणा तर दुसरीकडे दीपिका दाक्षिणात्य दिग्दर्शक ॲटलीच्या 'राका' सिनेमात अभिनेता अल्लू अर्जुनसोबत स्क्रीन शेअर करणार आहे. मात्र आता प्रेग्नंसीमुळे दीपिका या सिनेमातून बाहेर पडणार का? असा संभ्रम निर्माण झाला. यावर नुकतंच मेकर्सने उत्तर दिलं आहे. 'राका' सिनेमातून दीपिका पादुकोणला बाहेर काढल्याच्या किंवा तिची भूमिका कमी केल्याची चर्चा झाली. या चर्चांवर आता मेकर्सने उत्तर दिलं आहे. एका मुलाखतीत सिनेमाच्या प्रमोशनल टीमने स्पष्ट केले की, सगळं नियोजनाप्रमाणेच सुरु आहे. काहीही बदल करण्यात आलेला नाही. दीपिकाची सिनेमात महत्वाची भूमिका आहे आणि ती सेटवर दमदार एनर्जीने काम करत आहे. शूटिंगमध्ये कोणत्याही प्रकारचा अडसर आलेला नाही. दीपिका कामाप्रती प्रोफेशनल आहे. तसंच सेटवर सुरक्षा आणि सोयीसुविधांची खबरदारी घेण्यात आली आहे. सिनेमाचं शेड्युल वेगाने पुढे जात आहे आणि डेडलाईन आधीच काम पूर्ण करण्याची टीमची तयारी आहे. 'राका' सिनेमासाठी दीपिका ॲक्शन सीन्सचंही शूट करत आहे. प्रेग्नंसीतही ती पूर्ण एनर्जीने हे सीन्स पूर्ण करत आहे. याआधीही तिने पहिल्या प्रेग्नंसीवेळी 'सिंघम अगेन' सिनेमासाठी मेहनत घेतली होती. २०२४ मध्ये तिने दुआला जन्म दिला. लेकीच्या जन्मानंतर दीपिकाने ८ तासांच्या शिफ्टची मागणी केली. तसंच मानधनात वाढ, प्रॉफिट शेअर असा मागण्याही केल्याची चर्चा झाली होती. यामुळे तिला 'स्पिरीट' आणि 'कल्की २' या बिग बजेट सिनेमातून बाहेर पडावं लागलं होतं. दरम्यान आता दुसऱ्या प्रेग्नंसीमुळे तिला 'राका' हा बिग बजेट सिनेमाही गमवावा लागेल अशी चर्चा झाली होती. या चर्चांना मेकर्सने पूर्णविराम दिला आहे.

# मोहनलाल आणि ममूटीच्या 'पॅट्रियट'ची रिलीज डेट पुढे ढकलली!




मोहनलाल आणि ममूटी हे एक उत्तम साउथ इंडस्ट्रीमधील अभिनेते आहे. तर यांचा 'पॅट्रियट' हा बहुप्रतिक्षित चित्रपट लवकरच येणार आहे आणि चित्रपटाची तारीख आता रिलीज झाली आहे. याची प्रदर्शनाची माहीती निर्मात्यांनी दिली आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शिन महेश नारायणन केले आहे. तर हा चित्रपट २३ एप्रिल २०२६ रोजी प्रदर्शित होणार होता, मात्र आता हा १ मे २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. तर या चित्रपटात फासिल आणि नयनतारा यांच्याही प्रमुख भूमिका आहेत. ममूटी मोहनलाल हे एक महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहेत. हा एक मल्याळम ॲक्शन थ्रिलर चित्रपट आहे.

प्रदर्शनाची तारीख जाहीर करणारे पोस्टर शेअर करत ममूटी यांनी इन्स्टाग्रामवर लिहिले आहे की, पॅट्रियट १ मे २०२६ पासून जगभरातील चित्रपटगृहांमध्ये.'पॅट्रियट'च्या निर्मात्यांनी चित्रपट पुढे ढकलण्याचे कारण इन्स्टाग्रामवर स्पष्ट केले होते. निवेदनात म्हटले आहे, आम्ही 'पॅट्रियट' सर्वोत्तम गुणवत्तेसह तुमच्यासमोर आणण्यासाठी कठोर परिश्रम घेत आहोत. मात्र काही अनपेक्षित परिस्थितीमुळे, चित्रपटाची २३ एप्रिलची प्रदर्शनाची तारीख काही दिवसांसाठी पुढे ढकलणे आवश्यक झाले होते.

'पॅट्रियट' या चित्रपटाची निर्मिती अँटो जोसेफ आणि के. जी. अनिल कुमार यांनी अँटो जोसेफ प्रॉडक्शन्सच्या बॅनरखाली केली आहे. तर या चित्रपटात ममूटी आणि मोहनलाल यांच्या व्यतिरिक्त, या चित्रपटात फहाद फासिल, नयनतारा, राजीव मेनन, रेवती, ग्रेस अँटनी, झरीन शिहाब, श्रीपार्वती, गीती संगीता, जिनू जोसेफ, दानिश हुसेन, शाहीन सिद्दिकी, सनल अमन आणि प्रकाश बेलावडी यांनी महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत.

# 'स्वयंभू' चित्रपटात निखिल सिद्धार्थ

निखिल सिद्धार्थ या अभिनेत्याला 'कार्तिकेय २' या चित्रपटामुळे देशभरात ओळख मिळाली. आता तो 'स्वयंभू' या चित्रपटाद्वारे पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित करण्यात आला असून तो सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. यात निखिल एक अत्यंत क्रूर आणि शक्तिशाली योद्ध्याच्या अवतारात दिसून येतोय. जबरदस्त ॲक्शन दृश्यं, आकर्षक व्हिज्युअल्स आणि एनर्जेटिक बॅकग्राउंड स्कोरने युक्त या टीझरने प्रेक्षकांमध्ये वातावरणनिमिर्ती केली आहे. या टीझलने पाहता पाहता १.८ कोटी व्ह्यूजचा आकडा पार केला आहे. या चित्रपटाचे एक गीतही प्रदर्शित कण्यात आल्याने संगीत आणि व्हिज्युअल अनुभवावरून उत्सुकता आणखी वाढली आहे. भारताच्या सुवर्णयुगायच भव्यतेदरम्यान चित्रपटाचा टीझर एक अशी कहाणी सादर करतो, जी संस्कृती, वीरता आणि परंपरांमध्ये दृढपणे वसलेली आहे. या कहाणीच्या केंद्रस्थानी 'सेंगोल' असून तो वारसा, न्याय आणि धर्माच्या अवतीभवती फिरणारी एक महागाथा दर्शवितो. निखिल यात अत्यंत प्रभावशाली अंदाजात दिसून येत आहे. या चित्रपटासाठी उत्कृष्ट आणि दिग्गज तंत्रज्ञ आणि क्रिएटिव्ह लोकांची एक असाधारण टीम एकत्र आली आहे. भरत कृष्णमाचारी यांच्या दिग्दर्शनात तयार होणाऱ्या या चित्रपटाला रवि बसरुर यांचे संगीत लाभले आहे. तर बाहुबली आणि आरआर आरचे सिनेमेटोग्रॉफर के.के. सेंथिल कुमार यांनी याच्या व्हिज्युअल्सना आकर्षक रुप दिले आहे. स्वयंभू हा चित्रपट पिक्सेल स्टुडिओजकडून निर्माण करण्यात आला आहे. भारताचा समृद्ध इतिहास आणि अमर गौरवाला एका महाकाव्य आदरांजलीच्या स्वरुपात सादर करण्यात येणारा हा चित्रपट यंदाच प्रदर्शित होणार आहे.



# डेटिंगसाठी मला वेळच नाहीये



तरुणाईचा मृणालला अनेकदा यावर प्रश्न विचारण्यात आला. परंतु तिने मात्र मौन बाळगणे पसंत केले. याशिवाय या चर्चा हसण्यावारी नेल्या. आता अनेक महिन्यांनंतर धनुषने अवघ्या काही वाक्यांत डेटिंगच्या या चर्चांवर त्याचं मत व्यक्त केलंय.

गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर मृणाल ठाकूर आणि धनुष एकमेकांना डेट करत असल्याच्या चर्चांना उधाण आले. एका सिनेमाच्या स्क्रीनिंगदरम्यान मृणालने धनुषला बोलावल्याने आणि दोघांमधील वाढती मैत्री पाहून मृणाल- धनुष एकमेकांना डेट करत असल्याच्या चर्चा पसरल्या. मृणालला अनेकदा यावर प्रश्न विचारण्यात आला. परंतु तिने मात्र मौन बाळगणे पसंत केले. याशिवाय या चर्चा हसण्यावारी नेल्या. आता अनेक महिन्यांनंतर धनुषने अवघ्या काही वाक्यांत डेटिंगच्या या चर्चांवर त्याचं मत व्यक्त केलंय. परंतु नुकत्याच एका मुलाखतीत तिने या चर्चांवर तिचं स्पष्ट मत व्यक्त केलं आहे. मृणाल म्हणाली- मी माझ्या सिनेमांतील कामासाठी ओळखलं जावं. 'ती कोणाला डेट करतेय?' अशा गोष्टींसाठी मला ओळखलं जाऊ नये. खरं सांगायचं तर माझ्याकडे डेटिंगसाठी वेळच नाहीये. माझ्या पायाच्या स्नायूला दुखापत झाली आहे. एक्सरे काढल्यानंतर मला पुढील उपचारांसाठी जायलाही वेळ मिळालेला नाही. मग वैयक्तिक आयुष्यात डेटिंग वगैरेचा विचार तर सोडाच., अशा स्पष्ट शब्दांत मृणालने सर्व चर्चांना पूर्णविराम दिला. मृणाल आणि धनुष एकमेकांशी लग्नबंधनात अडकणार अशी चर्चा वाऱ्यासारखी पसरली. इतकंच नव्हे दोघांच्या लग्नाचं ठिकाण ठरलं अशीही बातमी समोर आली. परंतु मृणाल आणि धनुषने आजवर या चर्चांवर काहीच प्रतिक्रिया दिली नाही. त्यांनी कायमच मौन बाळगलं आणि कोणताही खुलासा केला नाही. दोघांनी घेतलेल्या या निर्णयाचं सर्वांना कौतुक असलं तरीही त्यांच्या डेटिंगच्या चर्चा मात्र थांबत नव्हत्या. आता मृणालने स्वतः हे सांगितल्याने आता तरी तिच्या आणि धनुषच्या लग्नाच्या चर्चा बंद होतील, अशी सर्वांना आशा आहे. धनुषनेही मीडियात कधीच या गोष्टीचा उल्लेख केला नाही. दोघांच्या वर्कफ्रंटबद्दल सांगायचं तर, मृणाल नुकतीच डकैत या हिंदी सिनेमात झळकत आहे. तर धनुष सध्या ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या बायोपिकमध्ये झळकत आहे.



बालमा तेरा इंतजार है...' प्रियकराच्या आगमनाच्या आतुरतेत आनंद असतो, अधिरता असते तसेच संभाव्य व्याकुळ भावही असतात. तो आल्याचे दिसताच दाही दिशा प्रीतिभावाने भरून जातात. १९४९ सालच्या 'बरसात' या पदार्पणातील चित्रपटातच आपल्या अभिनयाच्या भात्यातील सर्वच शस्त्राचा वापर बेखुबीने करून निम्मी यांनी चित्रपट जगत जिंकले. 'बरसात में हमसे मिले तुम सजन तुमसे मिले हम... बरसात में...' चित्रपट गीतात सर्वात जास्त गाजलेल्या या बरसाती गाण्यातील तुषार आजही रसिक मनाला गारवा देतात.

# पौर्णिमेचे उदास चांदणे: अभिनेत्री

## निम्मी

**जिया बेकरार है छायी बहार है आजा मेरे**
**'तुम न जाने किस जहाँ मे खो गये...'**

१९५१ सालच्या 'सजा' सिनेमातील या गाण्यात खूबसूरत टवटवीत चेहरा व नेत्रात नशिली जादू असूनही निम्मी यांना आर्त व दुःखी अभिनयासाठी अर्धे नेत्र मधून मधून पापणीच्या पंखाखाली लपवून ठेवावे लागले. 'मौत भी आती नही रात भी जाती नही दिल को ये क्या हो गया कोई शह भाती नही' याही गाण्यात प्रेमज्वालेने पोळलेले अंतःकरण त्यांना मोकळे करावे लागले. उद्विग्नतेत भान हरपून म्हणावे लागले. 'ले जा मेरी दुवाए ले जा परदेस जानेवाले...' १९५१ च्या 'दिदार' चित्रपटात नेत्रहीन दिलीपकुमारवर मनस्वी प्रेम करूनही प्रेमापासून वंचित राहतात.

'कहता है इशारो में कोई आ मोहे अंबुवाके तले मिल' नुकतीच तारुण्याची झळ लागलेल्या निम्मी, नायकाच्या संभाव्य प्रेमातील सफलतेमुळे अतिशय आनंदात आपल्या मैत्रिणींसोबत १९५२ सालच्या 'आन' चित्रपटात हे गीत गाताना अक्षरशः प्रेमाच्या हिंदोळ्यावर बसून सुसाटपणे लज्जामिश्रित भाव अल्लडपणे प्रकट करतात. 'भला वो कौन है घायल...' मैत्रिणीच्या या पृच्छेवर निमिष खाली करून स्त्रीसुलभ सहजतेच्या भावात म्हणतात... 'मै नाम ना लू, आज लगे लाज सखी धडके मेरा दिल...' नौशादी संगीताच्या साजात सजलेले हे गीत वेगळीच जादू करून गेले. जगभरात प्रदर्शित झालेला पहिला भारतीय चित्रपट 'आन'च्या लंडनमधील प्रिमियर शो दरम्यान हॉलिवूडचा दिग्गज कलाकार एरॉल फ्लीन यांनी निम्मीच्या हाताचे चुंबन घेण्याचा प्रयत्न केल्यावर तिने त्यांना ठणकावले. तिला हॉलिवूडमध्ये 'नो किस गर्ल' म्हणू लागले. एवढेच नव्हे, तर हॉलिवूड चित्रपटांच्या ऑफरही तिने नाकारल्या. 'प्रीत ये कैसी बोल रे दुनिया, प्रीत ये कैसी बोल' १९५२ सालच्या 'दाग'मधील या गाण्यात, समर्पण भावाने नायकावर प्रेम करून त्याच्या बरोबर सुखस्वप्नात रंगून गेल्यावरही ते सर्व दिवास्वप्न ठरले. व्यथित अवस्था या गाण्यात निम्मीने यथार्थपणे अभिनित केली.'न मिलता गम तो बरबादी के अफसाने कहाँ जाते अगर दुनिया चमन होती तो विराने कहाँ जाते' अतिशय भावुक व मनोहर नेत्रांच्या निम्मी १९५४ सालच्या 'अमर' चित्रपटातील या गाण्यात प्रेमातील आशेचे किरण मिटल्यावर व्यथित होऊनही अन्य प्रेमिकेला मुबारक संदेश देते. 'मुबारक गैर को खुशिया मुझे गमसे मोहोब्बत है' स्वतः उद्ध्वस्त होऊनही जगरहाटीचा आधार घेऊन म्हणते... 'अगर होते सभी अपने तो बेगाने कहाँ जाते' डोळ्यात जागविलेली प्रीतीची स्वप्ने उधळल्यावर अर्धवट मिटलेल्या डोळ्यांनी स्वतःची कणव प्रस्तुत करण्याचा अभिनय लाजवाब! 'मोरे संयाजी उतरेंगे पार हो नदिया धीरे बहो' प्रेमाच्या क्षेत्रात याहून मोठे समर्पण काय असेल? १९५५ च्या 'उडन खटोला' चित्रपटात भरधाव वेगाने वाहणार्या प्रत्यक्ष नदीला ती वरील निवेदन करते. निम्मी या अतिशय गुणवान अभिनेत्रीने बऱ्याच चित्रपटात नायिकेची कामे केलीत तरीही त्यांच्यातील फक्त समर्पण भावाच्या शोकान्त अभिनयाचा वापर निर्मात्यांनी केला व त्यांना दुय्यम अभिनेत्रीचे स्थान मिळाले. 'नैन मिले चैन कहाँ दिल है वही तू है जहाँ' कन्नड कादंबरी 'हंसगीत'चे सांगीतिक रूपांतर म्हणजे १९५६ सालचा 'बसंत बहार' हा चित्रपट! वैरभावाने विषप्रयोगामुळे आवाज गमावलेले भारत भूषण निम्मी यांनी वरील निस्सीम प्रेमभरे गाणे त्यांच्या पुढे म्हटल्यावर या मुक्या संगीतप्रेमी राजहंसाच्या मुखातून खालील ओळी हंसगीताच्या स्वरूपात मन्ना डे यांच्या सुस्वरात बाहेर पडतात. 'चुपचुप रहे के, लुटाया दिल तुझपे इक सुख पाया मैने सौ सुख सहेके' निम्मी यांच्या जीवनात 'बसंत बहार' येते. 'शराबी जा जा जा...' १९५६ सालच्या 'भाई भाई' चित्रपटात नशेत धुंद अशोककुमारपासून सुटका होण्यासाठी ह्या गाण्यात त्यांना हुलकावणी देत गुंतविते. 'धडकते दिल की तमन्ना हो मेरा प्यार हो तुम' १९६१ सालच्या 'शमा' चित्रपटात सुरय्या यांनी गायलेले हे गीत पडद्यावर सुरय्या व निम्मीवर चित्रित आहे. सुरय्या सोबत प्रेमातील जुगलबंदीत 'प्लॅटॉनिक लव्ह'चा आविष्कार बोलक्या नेत्रातून सहज प्रकट करून अभिनयात बाजी जिंकली. १८ फेब्रुवारी १९३३ रोजी आग्रा येथे अब्दुल हकीम व तत्कालीन गायिका अभिनेत्री वहिदणबाई या दाम्पत्याच्या पोटी नवाबबानो उर्फ निम्मी यांचा जन्म झाला. अनिमिष स्वप्नाळू नेत्रातील लाघवी कटाक्षाने समोरच्याला आकर्षित करणाऱ्या या लावण्यवतीला 'अंदाज' चित्रपटाच्या सेटवर राज कपूर यांनी परखले व वयाच्या १६ व्या वर्षी आर. के. बॅनरच्या पहिल्याच 'बरसात' चित्रपटात त्यांची निवड केली. राज कपूर यांनी त्यांचे 'निम्मी' हे नाव ठेवले. १९५० व १९६० चे दशक गाजविणाऱ्या निम्मी यांनी ५० हून अधिक चित्रपटात कामे केलीत. १९८६ सालचा 'लव्ह अँड गॉड' त्यांचा अखेरचा चित्रपट होता. २०१५ साली त्यांना जीवनगौरव पुरस्कार मिळाला. अनेक चित्रपटात स्मरणीय भूमिका करूनही फिल्म फेअर पुरस्कार त्यांना मिळाला नाही. तरीही त्या काळात सर्वात जास्त मानधन घेणाऱ्या अभिनेत्रींपैकी होत्या. 'डंका' नामे एका चित्रपटाच्या निर्मितीतही त्यांचा सहभाग होता. १९६५ साली विख्यात चित्रपट लेखक अलीराजासोबत निकाह केला. २५ मार्च २०२० रोजी वयाच्या ८८ व्या वर्षी कोरोना संसर्गामुळे त्यांचे निधन झाले. चित्रपटसृष्टीच्या बसंतातील बहार संपुष्टात आली. 'तुम न जाने किस जहाँ मे खो गये...'

**रमेश पोफळी**

# तो सेटवर यायचा तेव्हा...

अशा अनेक अभिनेत्री आहेत, ज्यांनी आधी दाक्षिणात्य इंडस्ट्रीत काम केलं आणि मग हिंदी इंडस्ट्रीमध्येही काम करीत आपल्या अभिनयानं प्रेक्षकांची मनं जिंकली. त्यापैकीच एक नाव म्हणजे सध्या ऑस्करमुळे चर्चेत असणारी प्रियांका चोप्रा. प्रियांका चोप्रानं दाक्षिणात्य चित्रपटात काम करीत मनोरंजन विश्वात पदार्पण केलं होतं. प्रियांका चोप्रानं नुकत्याच पार पडलेल्या ऑस्कर पुरस्कार सोहळ्यात हजेरी लावलेली. यावेळी तिच्या लूकचीही सोशल मीडियावर बरीच चर्चा झाली. अशातच आता नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत तिनं तिच्या पहिल्या चित्रपटाबद्दल माहिती दिली.

यावेळी तिनं दाक्षिणात्य अभिनेता विजय थलपतीबरोबर काम करण्याचा अनुभवही सांगितला आहे. विजयबरोबर काम करण्याचा अनुभव सांगत प्रियांका म्हणाली, मी थामीझान नावाच्या तमीळ चित्रपटात काम केलं होतं. लोकप्रियता काय असते याचा अनुभव पहिल्यांदाच मी या चित्रपटातून घेतला. त्यात माझा सहकलाकार विजय होता, जो खूप लोकप्रिय आहे आणि मला आठवतंय की, तो सेटवर यायचा तेव्हा खूप लोक असायचे. मोठ्या संख्येनं लोक त्याचा अभिनय, नृत्य पाहण्यासाठी गर्दी करायचे. प्रियांका चोप्रा १८ व्या वर्षी पहिल्यांदाच चित्रपटात काम करण्याबद्दल म्हणाली, तो माझा पहिलाच चित्रपट होता. त्यामुळे पडद्यामागे काय होतं याबद्दल मला काहीच कल्पना नव्हती. मी विचार करायचे की, इतकी प्रसिद्धी असताना कसं वाटत असेल, विशेषकरून भारतात जिथे प्रेक्षकांना चित्रपट खूप आवडतात आणि ते तुमच्यावर खूप प्रेमही करतात. प्रियांकाला पुढे विजयइतकीच प्रसिद्धी मिळावी, असं कधी वाटायचं का, असं विचारल्यानंतर तिनं सांगितलं की, आधी ती अभिनय आणि प्रसिद्धी यांना एकच समजायची. ती म्हणाली, मी १८ वर्षांची असताना मला असं वाटायचं की, प्रसिद्धीच सगळं काही असते का? मला असं वाटायचं की, हे सगळं प्रसिद्धीसाठीच असतं. पण जेव्हा मी पूर्णपणे या क्षेत्रात सक्रिय झाले तेव्हा जाणवलं की, लोकप्रियता, प्रसिद्धी या क्षेत्राचा भाग आहेत. अभिनयाबरोबर त्या येतात; पण ते काही वेगळं काम नाहीये.



# 'घबाडकुंड' मध्ये संदीप पाठकचा हटके अंदाज

चाकोरीबाहेरील विषयांना प्राधान्य देत प्रभावी भूमिका साकारणाऱ्या कलाकारांमध्ये अभिनेता संदीप पाठक यांचं नाव आवर्जून घेतलं जातं. विनोदीच नव्हे तर गंभीर धाटणीच्या भूमिकाही तितक्याच ताकदीने साकारत त्यांनी मराठी सिनेसृष्टीत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या वैविध्यपूर्ण भूमिकांनी प्रेक्षकांना कायमच भुरळ घातली आहे. आता मात्र प्रेक्षकांना संदीप पाठक यांचा एकदम वेगळा अंदाज पाहायला मिळणार आहे. सोन्याच्या मोहात ते चक्क एका गूढ विहिरीत उतरले आहेत. पण हे सोनं नेमकं काय आहे? आणि त्यामागचं रहस्य काय? या सगळ्या प्रश्नांची उत्तरं 'घबाडकुंड' या चित्रपटातून उलगडणार आहेत. संदीप पाठक यांच्या 'दिल्या' या व्यक्तिरेखेचा अचंबित करणारा टीझर नुकताच प्रदर्शित झाला आहे. त्यामध्ये संदीप पाठक यांचा आजवर न पाहिलेला भन्नाट अवतार समोर आला आहे. ओरस गावातील 'अल्याड-पल्याड' च्या गूढ आणि थरारक घटनांमधून प्रेक्षकांच्या मनात घर करणारा 'दिल्या' आता 'घबाडकुंड' युनिव्हर्समधील नव्या कथेत पुन्हा एकदा भेटणार आहे. भुतांच्या भयावह अनुभवांनंतर गाव सोडून नव्या ठिकाणी स्थायिक झालेल्या दिल्याची ही कहाणी 'घबाडकुंड' चित्रपटाच्या युनिव्हर्सला अधिक गूढ आणि रोमहर्षक बनवणार आहे. 'घबाडकुंड' या नव्या चित्रपटातून कल्पनेच्या पलीकडचं 'युनिव्हर्स' मराठीत मोठ्या पडद्यावर साकारण्याचा धाडसी प्रयत्न दिग्दर्शक प्रितम एस. के. पाटील यांनी केला असून त्यांच्या या नव्या संकल्पनेला आयकॉन दी स्टाईल' संस्थेचे निर्माते डॉ. रसिक कदम यांची साथ लाभली आहे. 'घबाडकुंड' येत्या १९ जूनला प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. संदीप सांगतात, या चित्रपटातील काही प्रसंग अंगावर शहारे आणणारे आहेत.



# ममूटी यांच्या प्रत्येक गाडीचा नंबर ३६९च का?




ममूटी हा एक लोकप्रिय सुपरस्टार आहे. आणि त्याने अनेक उत्तम चित्रपट केले आहेत. तसेच तो त्याच्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात त्याने स्थान निर्माण केले आहे. तर त्याचे चाहते नेहमी त्याच्या वैयक्तिक बाबी जाणुन घेण्यासाठीही उत्सुक असतात. तर त्यांच्या गाड्या आणि ३६९ या क्रमांकाशी निगडित रंजक कथांसाठीही ओळखले जातात. त्यांच्या संग्रहात अनेक आलिशान गाड्या आहेत, मात्र फार कमी लोकांना हे माहीत आहे की ममूटी यांना ३६९ हा क्रमांक त्याच्या आवडीचा आहे.

सुपरस्टार ममूटीचे चाहते आहेत त्यांनाही हे माहीत नाही की त्यांच्या आयुष्यात या क्रमांकाला इतके महत्त्व का आहे. त्यांच्या सर्व गाड्यांची नोंदणी ३६९ या क्रमांकाने केलेली आहे. असे म्हणले जाते की, त्याच्याकारकिर्दीच्या सुरुवातीला ममूटी यांनी ३६९ हा लॉक कोड असलेली एक ब्रीफकेस खरेदी केली होती. त्यांना हा क्रमांक आवडला कारण तो ३ चा पटीत आहे. आणि तेव्हापासुन या नंबरची ओढ लागली आणि त्यानी त्याच्या गाड्याना या नंबरची प्लेट लावली. जॅग्वार एक्सजे, टोयोटा लँड क्रूझर, ऑडी ए७, मित्सुबिशी पाजेरो स्पोर्ट, टोयोटा फॉर्च्युनर तर या सर्व वाहनांची नोंदणी क्रमांक ३६९ ने झाली आहे.

ममूटी यांचे ३६९ नोंदणी क्रमांक असलेल्या गाड्यांसाठी एक फेसबुक पेजसुद्धा आहे. ममूटी आता त्याच्या आगामी चित्रपटात मोहनलाल यांच्यासोबत 'पॅट्रियट यात दिसणार आहेत. आणि हा चित्रपट १ मे २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. खरे तर २३ एप्रिल २०२६ रोजी प्रदर्शित होणार होता, परंतु तो पुढे ढकलण्यात आला होता. तर हा चित्रपट पाहण्यासाठी त्याचे चाहते आता उत्सुक झाले आहेत.



# देवरकोंडाच्या नव्या चित्रपटाची सुरुवात

दक्षिण चित्रपटसृष्टीत सध्या एका नव्या चित्रपटाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. अभिनेता विजय देवरकोंडा आणि दिग्दर्शक शौर्युव यांच्या आगामी चित्रपटाची अधिकृत सुरुवात नुकतीच मुहूर्त पूजेद्वारे झाली. या खासप्रसंगी प्रसिद्ध अभिनेता नानी यांनी उपस्थित राहून चित्रपटाला पहिला क्लॅप दिला, ज्यामुळे या प्रोजेक्टला एक खास आणि सकारात्मक सुरुवात मिळाली. हा चित्रपट 'हाय नन्ना' फेम दिग्दर्शक शौर्युव यांचा दुसरा चित्रपट आहे. त्यामुळे त्यांच्या या नव्या प्रोजेक्टकडून प्रेक्षकांच्या अपेक्षा खूपच वाढल्या आहेत. मुहूर्ताच्या वेळी नानी आणि विजय देवरकोंडा एकमेकांना भेटले आणि त्यांनी एकमेकांना मिठी मारत आनंद व्यक्त केला. हा क्षण चाहत्यांसाठी खास ठरला.

दिग्दर्शक शौर्युव यांनी त्यांच्या सोशल मीडियावर या मुहूर्त सोहळ्याचे काही फोटो शेअर केले. या फोटोमध्ये नानी विजयसमोर पहिला क्लॅप देताना दिसत आहेत. त्याचबरोबर शौर्युव यांनी या चित्रपटाबद्दल भावना व्यक्त करत म्हटले की, काही क्षण आयुष्यभर लक्षात राहतात. या चित्रपटात नानी सरांचा सहभाग माझ्यासाठी खूप खास आहे. आजपासून या प्रवासाची सुरुवात झाली आहे. आता फक्त प्रेक्षकांनी थोडा संयम ठेवावा आणि पुढे काय येणार आहे ते पाहावे. विजय देवरकोंडानेही या चित्रपटाबद्दल आनंद व्यक्त केला आहे. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत सांगितले की, हा चित्रपट त्यांच्यासाठी एक मोठे आव्हान आहे. त्यांनी लिहिले की, ही एक कठीण आणि आव्हानात्मक फिल्म आहे. पण मला या टीमसोबत काम करण्याचा खूप आनंद आहे. मी माझे पूर्ण योगदान देण्याचा प्रयत्न करणार आहे. विजयने शेअर केलेल्या पोस्टरमध्ये तो कुत्र्यांच्या समूहासोबत चालताना दिसतो, जणू ते त्याचे रक्षण करत आहेत. या पोस्टरमुळे चित्रपटाची कथा थोडी रहस्यमय आणि वेगळी असणार असल्याचा अंदाज लावला जात आहे. मात्र, चित्रपटाच्या कथेबद्दल अजून अधिक माहिती समोर आलेली नाही. सध्या या चित्रपटाचे नावही जाहीर झालेले नाही. मात्र, विजय देवरकोंडा आणि शौर्युव यांची जोडी, तसेच नानीसारख्या मोठ्या कलाकाराची उपस्थिती यामुळे या चित्रपटाबद्दल प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

येत्या काळात या चित्रपटाबद्दल आणखी माहिती समोर येण्याची शक्यता आहे. एकूणच, या चित्रपटाची सुरुवातच मोठ्या थाटात झाली असून, आता चाहत्यांना या चित्रपटाच्या प्रदर्शनाची आतुरतेने वाट पाहावी लागणार आहे.



# अहान पांडेसोबत दिसणार शर्वरी वाघ

फिल्ममेकर अली अब्बास जफरने स्वत:च्या नव्या ॲक्शन-रोमान्स चित्रपटाचे चित्रिकरण सुरू केले आहे. त्याच्या या चित्रपटात अहान पांडे मुख्य भूमिकेत आहे. अहानचा मागील चित्रपट 'सैयारा यशस्वी ठरला होता. तर अली अब्बास जफरच्या चित्रपटाचे चित्रिकरण मुंबईत सुमारे एक महिन्याभर चालणार आहे. अली अब्बास जफरने अहानसोबतचे छायाचित्र शेअर करत चित्रिकरण सुरू झाल्याची घोषणा केली. या चित्रपटात अहानची नायिका म्हणून शर्वरी वाघ झळकणार आहे. मे २०२६ मध्ये चित्रपटाची टीम लंडन येथील चित्रिकरणासाठी रवाना होणार असून तेथे मोठ्या ॲक्शनदृश्यांचे चित्रिकरण पाच दिवसांपर्यंत चालणार आहे. अहानने या चित्रपटासाठी कठोर मेहनत घेतली असून यात हँड-टू-हँड कॉम्बॅट आणि शस्त्रास्त्रांचे प्रशिक्षण सामील आहे. हा चित्रपट त्याला 'सैयारापेक्षा अत्यंत वेगळ्या अवतारात सादर करणार आहे. निर्माते जुलै महिन्यापर्यंत याचे चित्रिकरण पूर्ण करण्याची योजना आखत असून पुढील वर्षी तो प्रदर्शित करण्याचा विचार आहे. या चित्रपटात ऐश्वर्य ठाकरे हा खलनायकाच्या भूमिकेत असल्याची चर्चा आहे. ऐश्वर्यने 'निशांचीद्वारे बॉलिवूडमध्ये पदार्पण केले होते.

# 'मॉम २'मध्ये दिसणार खुशी कपूर



अभिनेत्री खुशी कपूर स्वत:ची आई श्रीदेवीचा अखेरचा चित्रपट 'मॉम'च्या सीक्वेलमध्ये काम करणार आहे. खुशीने २०२३ मध्ये 'द आर्चीज'मधून पदार्पण केले होते आणि आता ती 'मॉम २'चे चित्रिकरण करत आहे. दिग्दर्शक रवि उदयवार यांचा चित्रपट 'मॉम' हा एक रिव्हेंज थ्रिलर होता, ज्यात श्रीदेवींनी देवकी ही भूमिका साकारली होती. ही महिला स्वत:च्या सावत्र मुलीवर झालेल्या क्रौर्याचा सूड घेणारी होती. श्रीदेवीने २०१७ चित्रपटासाठी मरणोत्तर सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त केला होता. हा चित्रपट श्रीदेवीच्या मृत्यूच्या काही महिन्यांपूर्वी प्रदर्शित झाला होता. 'मॉम २' चित्रपटाचे दिग्दर्शन गिरीश कोहली करत असून यात जीशु सेनगुप्ता आणि करिश्मा तन्नाही मुख्य भूमिकेत आहे. तर याची निर्मिती खुशीचे पिता बोनी कपूर करत आहेत. मॉम २ चित्रपटाचे चित्रिकरण उत्तरप्रदेशात यमुना एक्स्प्रेसवेच्या काठावर नव्या इंटरनॅशनल फिल्म सिटीत पार पडणार आहे. खुशीने यापूर्वी 'लवयापा' आणि नादानियां या चित्रपटांमध्येही काम केले होते. परंतु तिचे हे चित्रपट फारसे यशस्वी ठरले नव्हते. मॉम चित्रपटात श्रीदेवीसोबत अक्षय खन्ना आणि नवाजुद्दीन सिद्दीकी यांनी काम केले होते. तर चित्रपटात सजल अलीने श्रीदेवीच्या मुलीची भूमिका साकारली होती.

बॉलीवूड सेलिब्रिटी नेहमीच त्यांच्या फिटनेस, डाएट रूटीन यामुळे चर्चेत असतात. अलीकडेच 'धुरंधर २'मधील रिजवान या पात्रामुळे प्रसिद्धीझोतात आलेला मुस्तफा अहमद फक्त ट्रेनर नाहीये तर आता त्याने त्याच्या अभिनयानेसुद्धा अनेकांचं लक्ष वेधलं आहे. मुस्तफाने आतापर्यंत अनेक सेलिब्रिटींचा ट्रेनर म्हणून काम केलेलं आहे. अशातच आता नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत त्याला याबद्दल विचारल्यानंतर त्याने विकी कौशल आणि हृतिक रोशन यांच्याबद्दल सांगितलं आहे.

संवाद साधताना त्याला तू हृतिक रोशन, विकी कौशल आणि रणवीर सिंह यांना ट्रेन केलं आहेस. तर यापैकीत कोणत्या अभिनेत्याला ट्रेन करणं सोपं होतं आणि कोणाला ट्रेन करणं कठीण होतं असं विचारल्यानंतर तो म्हणाला, त्या सगळ्यांनाच ट्रेनिंग आवडतं. त्यामुळे तिघांनाही ट्रेन करणं सोपं होतं. खाण्यावर नियंत्रण ठेवण्याच्या बाबतीत बोलायचं झालं तर मग रणवीर सिंहला थोडं कठीण जातं. मला त्याच्याकडे लक्ष द्यावं लागतं. मी त्याच्या टीमला त्याने काय खालं, काही ऑर्डर केलंय का त्याच्या रूममध्ये याबद्दल विचारत असतो. त्याला न्यूटेला खूप आवडतो. त्यामुळे अशा गोष्टींपासून दूर राहणं त्याला कठीण जातं. त्याला खायला खूप आवडतो. तो एक सिंधी मुलगा आहे. त्यामुळे त्याला खायला इतकं आवडतं की त्यावर नियंत्रण ठेवणं कठीण जातं. मुस्तफाने एका मुलाखतीत हृतिक रोशन व विकी कौशल हे खूप खवय्ये असल्याचं सांगितलं आहे. मुस्तफा म्हणाला, हे सगळे खूप खवय्ये आहेत. हृतिक रोशनपासून सगळेच सगळ्यांनाच खूप खायला आवडतं. मी त्याला १३-१४ घी लावलेल्या पोळ्या खाताना पाहिलं आहे. त्याला खरंच खायला खूप आवडतं. त्याने तेव्हाच पोळ्या खाणं थांबवलं जेव्हा पोळ्या यायला उशीर होत होता.

# हृतिक एकावेळी खातो १४ पोळ्या



मुस्तफाने विकी कौशलच्या मेटाबॉलिझमबद्दल सागंतिलं आहे. तो म्हणाला की विकी कौशल वीटसुद्धा खाऊ शकतो. मुस्तफा अभिनेत्याबद्दल म्हणाला, तो वीटही खाऊ शकतो आणि त्याला ती पचेलसुद्धा. तो काहीही खाऊ शकतो आणि ते पचवू शकतो. त्याचं मेटाबॉलिझम कमाल आहे.